ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

No:- **CGRF/AZ/AUR/U / 323 / 2011 / 03 /** **Date :-**

To,

1. The Nodal Officer
   MSEDCL, Aurangabad.

2. Shri Qamruddin Qadarbaksh Chauhan,.
   House No.4-17-27, Mill Corner, Kotwalpura,
   Aurangabad.
   ( Con No. 490010382723)

**CASE NO: CGRF / AZ / AUR / U /323 / 2011 /03**

Sub: Grievance under the Maharashtra Electricity Regulatory Commission ( Consumer Grievance Redressal Forum & Ombudsman ) Regulation 2006

**INTERIM ORDER**

The Distribution licensee is directed to re-connect the electricity supply of the consumer complainant in the matter of grievance. against the part payment of Rs.5000/- till final decision in the matter.

**( V. B. Mantri )**
**Chairman**

**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.**

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/३२३/२०११/०३

तक्रार दाखल दिनांक :- २४/०१/२०११
निकाल दिनांक :- २३/०३/२०११

श्री कम्रोद्दीन कादरबक्ष चौव्हाण,
घर क्रमांक ४-१७-२७, मिल कॉर्नर,
कोतवालपुरा, राजस्थान गादीघर ,
औरंगाबाद.

(ग्राहक क्र.४९००१०३८२७२३) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत शहर विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | व्ही. बी. मंत्री | अध्यक्ष |
| | प्रदीप. अ. सगणे | सदस्यसचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २४/०१/२०११ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी,औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०२/०२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे. त्याचे वडिलाचे मृत्युमुळे त्यांनी ०७/०३/२००३ पासुन वीज बिल भरलेले नाही. माहे फेब्रुवारी २०१० मध्ये ग्राहकास चुकीचे रिडींग टाकुन ४९६५०/-रुपये रक्कमेचे वीज बिल देण्यात आले ते ग्राहकाने अनुक्रमे रुपये ३५०००/- दिनांक १९/०३/२०१० व रुपये १४६५०/- दिनांक ३१/०३/२०१० रोजी दोन हप्त्यामध्ये भरले आहे त्यानंतरही ग्राहकास माहे मार्च २०१० मध्ये रुपये २२५८४/-चे देयक देण्यात आले त्याबाबत ग्राहकाने अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष ग्रामीण परिमंडल औरंगाबाद येथे दिनांक १९/१०/२०१० रोजी तक्रार दाखल केली. त्या तक्रारीवर कक्षाने ६० दिवसाच्या कालावधीमध्ये कोणतीही कारवाई केलेली नाही त्यामुळे व्यथीत होऊन ग्राहकाने या मंचात तक्रार दाखल केली आहे. ग्राहकाने चुकीचे वीज बिल दुरुस्त करुन द्यावे,त्यामध्ये कोणतेही व्याज व दंडाची आकारणी करु नये व झालेल्या मानसीक त्रासापोटी १०००/- रुपये नुकसान भरपाई देण्याची विनंती मंचास केली आहे. तसेच ग्राहकाने वेगळा अर्ज सादर करुन महावितरण कंपनीने त्यांचा वीज पुरवठा सदर प्रकरणात मंचाचा निकाल होईपर्यंत खंडीत करण्यात येऊ नये याबाबत मंचास विनंती केली. मंचाने ग्राहकाने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन महावितरण कंपनीस ग्राहकाकडुन रुपये ५०००/- अग्रीम राशी भरुन घेवुन, मंचाचे पुढील आदेशा पर्यंत वीज पुरवठा खंडीत करु नये असा अंतरिम आदेश दिनांक २४/०१/२०११ रोजी पारीत केला व सुनावणीची पुढील तारीख ०२/०२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

२) दिनांक ०२/०२/२०११ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी प्रतिनिधी श्री पत्तेवार सहाय्यक लेखापाल व वीज ग्राहक उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचे सी.पी.एल. व मीटर बदली अहवालाची प्रत सादर करुन सांगीतले की ग्राहकास माहे मार्च २०१० मध्ये नोंदविलेल्या मीटर वाचणाचे मागील २६ महीण्यात समायोजन करुन मीटर रिडींग नुसार वीज बिल देण्यात आले आहे व ते योग्य आहे. ग्राहकाने देण्यात आलेले वीज देयक मीटर रिंडींग प्रमाणे योग्य नसल्याचे सांगीतले. मंचाने नोडल अधिकारी यांना ग्राहकाचा स्थळ निरिक्षण अहवाल व सन २००५ पासुन सी.पी.एल. सादर करण्यास सांगुन सुनावणीची पुढील तारिख दिनांक ०९/०२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक ०९/०२/२०११ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी श्री भारती व वीज ग्राहक उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी आपला मुद्देसुद जबाब व ग्राहकाचे सी.पी.एल. व स्थळ निरिक्षण अहवाल सादर केले. दोन्ही बाजुचे म्हणने ऐकुन घेतल्या नंतर प्रकरण निकासाठी ठेवण्यात आले.

४) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की, ग्राहकास जानेवारी २००८ ते मार्च २०१० या कालावधीत मीटर रिडींग न घेता वीज देयक देण्यात आले. ग्राहकाने दिंनांक ०७/०३/२००५ पासुन दिलेल्या वीज बिलाचा भरणा केला नसल्याचे दिसुन येत आहे. ग्राहकाचे जुने मीटर दिनांक ०८/०१/२०१० रोजी बदली करण्यात येवुन त्या ठिकाणी ४३८२१११ क्रमांकाचे नविन मीटर लावण्यात आले. त्यानंतर वरील मीटर दिनांक १९/०३/२०१०

रोजी बदली करुन त्या ठिकाणी १३०८१५३४ क्रमांकाचे मीटर लावण्यात आले. वरील दोन्ही मीटरचे समायोजित ८०६४ युनिटची समान २७ महीन्यामध्ये विभाजन करुन त्याची आकारणी माहे मार्च २०१० मध्ये केल्याचे सी.पी.एल. वरुन दिसुन येत आहे व ते मीटर बदली अहवाला प्रमाणे योग्य आहे.

५) ग्राहकाचे सी.पी.एल.वरुन असे दिसुन येते की, ग्राहकास माहे जानेवारी २००८ ते मार्च २०१० या कालावधीमध्ये मीटर रिडींग नुसार वीज बिल न देता सरासरी पध्दतीने वीज बिले देण्यात आली. व त्यामुळे ग्राहकाने त्याचा भरणा केला नाही असे प्रतीपादन आपल्या तक्रारीमध्ये केले आहे. ग्राहकाने वरील कालाधीमध्ये मीटर रिडींग नुसार सुधारीत वीज देयक देण्याबाबात महावितरण कंपनीकडे अनेक तक्रारी केल्या असल्याचे दिसुन येते. परंतु कंपनीने त्याची दखल न घेता त्याचा वीज पुरवठा दिनांक १५/०३/२०१० रोजी खंडीत केला.ग्राहकाने एकुण प्रंलबित वीज देयक ४९६५०/- चा भरणा दोन हप्त्यात केल्यानंतर त्याचा वीज पुरवठा सुरु करण्यात आला. महावितरण कंपनीने माहे जानेवारी २००८ ते मार्च २०१० या कालावधीमध्ये चुकीचे वीज देयक दिल्यामुळे ग्राहकाने त्याचा भरणा केला नाही. त्यामुळे वरील कालावधीत ग्राहकास लावलेल्या व्याज व दंडाची रक्कम भरण्यास ग्राहकास जबाबदार धरणे योग्य होणार नाही असे या मंचाचे मत आहे. सी.पी.एल. प्रमाणे माहे मार्च २०१० मध्ये व्याजाची एकुण रक्कम १३१७०.५९/- व माहे जानेवारी २००८ मध्ये व्याजाची प्रलंबित रक्कम रुपये ३३५०.३३/- दाखविण्यात आली आहे. त्यामुळे (१३१७०.५९ –३३५०.३३)=९८२०.२६/- रुपये ग्राहकास वीज बिलातुन कमी करण्यात यावेत.

# आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास माहे मार्च २०१० चे वीज देयकातुन व्याज व दंडाची रक्कम रुपये ९८२०.२६/- ची वजावट करुन सुधारीत वीज देयक देण्यात यावे.

२) मंचाचे अंतरिम आदेशानुसार ग्राहकाने भरणा केलेल्या रुपये ५०००/- अंतरिम देयकाची रक्कम सुधारीत वीज देयकातुन करण्यात यावी.

**वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.**

| | | |
|---|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** | **व्ही. बी. मंत्री** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |